प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. 24 जून 2022**

**पाटबंधारे विभागाच्या सूचनेनुसार समाधानकारक पावसाच्या आगमनापर्यंत 27 जून 2022 पासून सिडको अधिकारक्षेत्रात करण्यात येणार 25% पाणी कपात**

**नागरिकांनी पाणी जपून वापरण्याचे सिडकोचे आवाहन**

धरण क्षेत्रात अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने, सिडको महामंडळातर्फे सिडको अधिकारक्षेत्रातील नोड आणि गावांतील नागरिकांना पाण्याचा जपून वापर करण्याचे नम्र आवाहन करण्यात आले आहे. तसेच पाटबंधारे विभागाने सिडको महामंडळास सूचित केल्यानुसार उपलब्ध पाणी साठ्याचे काटेकोरपणे नियोजन करण्यासाठी 27 जून 2022 पासून सिडकोतर्फे 25% पाणी कपात करण्यात येणार आहे.

सिडकोतर्फे सिडको अधिकारक्षेत्रातील विविध नोड, गावे आणि हेटवणे पाणी पुरवठा योजना जलवाहिनी मार्गावरील गावांना पाणी पुरवठा करण्यात येतो. सिडकोचे हेटवणे धरण, नवी मुंबई महानगरपालिकेचे मोरबे धरण, एमआयडीसीचे बारवी धरण आणि मजीप्राचे पाताळगंगा धरण या जलस्रोतांद्वारे सिडकोकडून पाणी पुरवठा करण्यात येतो. परंतु उपरोक्त धरण क्षेत्रांत अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने उपलब्ध पाणी साठ्याचे काटेकोरपणे नियोजन करता यावे याकरिता सिडकोकडून 27 जून 2022 पासून 25% पाणी कपात करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करत सिडकोला सहकार्य करावे, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**